# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 23/10/2021 (शनिवार)
(दुपार)

---

### अपघातात मृत्यू

1) पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत मौजा वनपवनी शिवारात जबलपुर ते नागपुर एन .एच 44 हायवे रोड येथे दिनांक 21/10/2021 चे 18:30 वा. ते 19.00 वा. दरम्यान शिवराम सोमरशी उईके (मृतक), वय 40 वर्ष, रा. खैरनारात–छपारा जि–शिवनी (म.प्र.) हा मौजा वनपवनी शिवारात जबलपुर ते नागपुर एन .एच 44 हायवे रोडने पायदळ जात असता अज्ञात वाहन चालक आरोपीने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजिपणे चालवुन धडक दिली. या अपघातात त्याचे दोन्ही पायाला तसेच डोक्याला गंभीर मार लागल्याने तो जखमी झाला असता तो उपचारा दरम्यान मेयो हॉस्पीटल नागपुर येथे मरण पावला. पोस्टे. देवलापार येथे मिळालेल्या कागदपत्रावरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोना मोरेश्वर नागोसे पोस्टे देवलापार यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. देवलापार येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री सपोनी बोरकुटे मो.नं. 9545667223 हे करीत आहे.

2) पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 5 कि.मी. अंतरावरील मौजा बोरगाव शिवार बस स्टॉप समोर बोरगाव येथे दिनांक 21/10/2021 चे 20:30 वा. दरम्यान एमपी– 13/जीबी– 1707 क्रमांकाचा आयसर ट्रक वरील चालक आरोपीने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगात हयगयीने रस्त्याच्या परीस्थीती कडे दुर्लक्ष करून निष्काळजीपणे चालवुन पुलाजवळ काम सुरू असलेल्या ठिकानी उभे असलेल्या एमपी– 39/एच– 0696 क्रमांकाच्या टिप्परला जोरदार पाठीमागुन धडक दिली. या अपघातात दिप्पर मधील सचिन नथ्थुजी कुंभारे वय 27 वर्ष रा. बोरगाव ता. कळमेश्वर हा जागीच मरण पावला तर युवराज महादेवराव वानखेडे वय 43 वर्ष रा. बोरगाव ता. कळमेश्वर हे गंभीर जखमी झाले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– अरविंद पांडुरंग कुंभारे, वय 40 वर्ष, रा. बोरगाव ता. कळमेश्वर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184, 134(अ)(ब),177 कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री ठाकुर हे करीत आहे.

3) पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत वृंदावन लॉन टेकाडी वाय पॉईन्टचे समोर कन्हान येथे दिनांक 21/10/2021 चे 22:00 वा. ते 22.30 वा. दरम्यान फिर्यादीचा भाउ नामे– सुशील सत्यनारायण यादव(मृतक) हा आपली मोटर सायकल क्र. एम.एच 40/बी.एम. 2519 ने मनसर कडुन कन्हान कडे येत असतांना त्याने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालविल्याने व त्याचे वाहनावरून त्याचे संतुलन बिघडल्याने त्याचे वाहन रस्त्याच्या कडेला असलेल्या सिमेंटच्या डिवायडरच्या कठडयाला धडकल्याने तो वाहनासह खाली पडुन त्यास डोक्याला मार लागला. या अपघातात त्याचे डोक्यास गंभीर दुखापत झाल्याने त्यास उपचाराकरीता उपजिल्हा रूग्णालय कामठी येथे नेले असता, तेथील डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सुनील सत्यनारायण यादव यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री मेश्राम मो.क्र. 9923798688 हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. केळवद :– अंतर्गत 7 कि.मी. अंतरावरील मौजा नरसाळा शिवार येथे दिनांक 12/10/21 चे 11.00 वा. दरम्यान पुरूषोत्तम श्रावणजी ताजने (मृतक) वय 28 वर्ष रा. नरसाळा (खापा)ता. सावनेर हा स्वताच्या शेतात नरसाळा खापा येथे दिवसभर किटकनाषक औषधाची फवारणी करूण रात्री घरी परत आले. दुस–या दिवशी दि. 12/10/2021 चे सकाळी 11.00 वा. सुमारास त्याला उल्टी व चक्कर आल्याने उपचाराकरीता त्यास प्रथम खाजगी दवाखाना सावनेर येथे भरती केले व नंतर दि. 21/10/2021 चे 15.30 वा. मेओ हॉस्पिटल नागपुर येथे उपचार सुरू असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले. सदर मृतकाचे मृत्यु बाबतचे कागदपत्रे प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद

सदर प्रकरणी सरतर्फ नजिर कुरेशि मेयो पोलिस बुथ नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. केळवद येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा अमर झिने मो.क्र. 8180975125 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर